# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 91/2022 दिनांक : 01.03.2022

## 1)घरफोडी :–

**अर्धापुर :–**दिनांक 27.02.2022 रोजी चे 18.00 ते दि. 28.02.2022 चे 01.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी अक्सा कॉलनी अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व नातेवाईक कार्यक्रमासाठी परभणी येथे घर बंद करुन गेले असता घराचे मेन गेटचे कुलुप तोडुन व घरात प्रवेश करुन घरात लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी रोख रक्कम असा एकुण 1,06,000/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी मोहम्मद गौस मोहम्मद शकील, वय 22 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. अक्सा कॉलनी अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 50/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री दळवे**, **मो.क्रं. 7744827771** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :–

**लोहा :–**दिनांक 27.02.2022 रोजी चे 19.00 वा. ते दिनांक 28.02.2022 रोजीचे 06.00 वा. दरम्यान, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावर मौजे धावरी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे दोन बैल किंमती 60,000/– रुपयाचे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी गोपाल रोहीजी वाकडे, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. धावरी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 50/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2483 साखरे**, **मो. क्र. 9823015483** हे करीत आहेत.

## 3)रेती चोरी :–

**हदगाव :–**दिनांक 26.02.2022 रोजी चे 23.00 वा. ते 24.00 वा. चे दरम्यान, **तहसील कार्यालय समोरुन**, **हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन ट्रेलर क्रं. पी.बी./05–एएन–7074 त्यामध्ये 9 ब्रास भरलेली रेती तहसील कार्यालय हदगाव समोरुन ट्रेलरसह किंमत 2,26,450,/– रुपयाची चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अरुण पांडुरंग गिते, वय 39 वर्षे, व्यवसाय नौकरी मंडळ अधिकारी तहसील कार्यालय हदगाव रा. उखळाई आश्रम समोर हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 73/2022 कलम 379,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री खैरे**, **मो. क्रं. 9890186722** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**उस्माननगर :–**दिनांक 27.02.2022 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात मौजे वाका ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच व ईतर तीन ते पाच अनोळखी आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन शेती ताब्यात घेण्याचे कारणावरुन घातक शस्त्र लोखंडी रॉड,लोखंडी पाईप, कुऱ्हाडी, काटयाने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करुन डोके फोडुन गंभीर जखमी केले व शेतातील बैलांना मारुन बैलाचा पाय मोडला व पिकात ट्रॅक्टर घालुन पिकाचे अंदाजे 50,000/– रुपयाचे नुकसान करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी योगेश बालासाहेब हंबर्डे, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाका ता. उस्माननगर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 27/2022 कलम 143,147,148,149,326, 324,427,323,504,506 भादवि सह कलम 135 मु.पो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री थोरे, मो. नं. 9923070123** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**भोकर :–** दिनांक 28.02.2022 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **सीताखांडी घाट समोर भोकर रोड ते नांदेड जाणारे रोडवर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत शामराव दिगांबर पवार वय 48 वर्षे व्यवसाय हॉटेल चालक रा. बारड ता. मुदखेड जि. नांदेड** हा त्याचे मो.सा. क्रं. एमएच/26–एएक्स–4591 वर बसुन नांदेड कडे जात असताना नांदेड कडुन भोकर कडे येणारा हायवा ट्रक क्रं. एमएच/29–बीई–1859 चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत याचे मोटार सायकलला जोराची धडक दिल्याने गंभीर जखमी झाल्याने मरण पावला. वगैरे **फिर्यादी नितेशकुमार जगदीश जयस्वाल वय 36 वर्षे व्यवसाय वाहन चालक रा. इंदीरानगर बारड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 73/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री एस.कांबळे, मो.क्र. 9923413244** हे करीत आहेत.

## 6)पळवुन नेले :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 26.02.2022 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **गंगानगर टायर बोर्ड, नांदेड येथे,** यातील फिर्यादी चा **मुलगा नामे मोहम्मद मारुफ मोहम्मद सरवर कुरेशी वय 16 वर्षे रा. गंगानगर टायर बोर्ड, देगलुरनाका, नांदेड** यास राहते घरुन कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फुस लावुन पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी मोहम्मद सरवर मोहम्मद उस्मान कुरेशी वय 48 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गंगानगर टायर बोर्ड, देगलुरनाका, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 120/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री माणीक हंबर्डे, मो.क्र. 9823040224** हे करीत आहेत.

**2)बिलोली :–**दिनांक 27.02.2022 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **देशमुख नगर बिलोली फिर्यादीचे घरुन ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी चा **मुलगा नामे प्रथमेश गजानन गिरी वय 14 वर्षे व त्याचा मित्र अजय चंद्रकांत गिरी वय 14 वर्षे दोघे रा. देशमुख नगर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** हे खेळायला जातो म्हणुन गेले त्यांना कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी वर्षा गजानन बामने (गिरी) वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम/मजुरी रा. देशमुख नगर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 48/2022 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/श्रीमती कांबळे, मो.क्र. 9657787703** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**मरखेल :–** दिनांक 28.02.2022 रोजी चे 15.45 वा. चे सुमारास, **मौजे बेंम्बरा बस स्थानक अहिल्याबाई होळकर झेंडयाजवळ सार्वजनिक रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या जुगार खेळत व खेळवित असतांना 1500/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/2864 नारायण पांडुरंग यंगाले, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 36/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/94 बारी, मो.क्र. 9049918000** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**हिमायतनगर :–** दिनांक 28.02.2022 रोजी चे सुमारास, **आरोपीचे राहते घरी वारंग टाकळी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 1960/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री बालाजी गोविंदराव महाजन, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 35/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री बालाजी महाजन, मो.क्र. 9679707038** हे करीत आहेत.

## 9)गळफास घेवुन मृत्यु :–

**बारड :–**दिनांक 27.02.2022 रोजी चे 21.00 वा. ते दिनांक 28.02.2022 रोजीचे 08.30 वा. दरम्यान, **फिर्यादीचे शेतात देगाव शिवार ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे आकाश गंगाधर आंबेकर, वय 21 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देगाव बु. ता. अर्धापुर जि. नांदेड**, यांनी पोट दुखीच्या आजारास कंटाळुन दारुच्या नशेत शेतातील लिंबाचे झाडाला दोरीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार सचिन गंगाधर आंबेकर, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. देगाव बु. ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे बारड** आ. मृ. **04**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2375 पावडे, मो.नं. 9822179877** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड